# <u>जाहिरात</u>

**सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, सांगली**
**विधीज्ञ पॅनेल सन २०२४-२५**

मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली/मा.उच्च न्यायालय, मुंबई, व खंडपीठ औरंगाबाद, नागपूर/ महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई /मा.जिल्हा न्यायालय व दिवाणी न्यायालय, सांगली, सर्व तालुका न्यायालय, सांगली/ मा.औद्योगिक न्यायालय, मा.कामगार न्यायालय, सांगली/ मा.ग्राहक तक्रार निवारण मंच, सांगली/ मे.मोटार अपघात दावे न्यायाधिकरण /शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर येथे जिल्हा परिषद, सांगलीची बाजू मांडणेसाठी दि.१ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीसाठी विधीज्ञ पॅनेल गठीत करावयाचे आहे. त्यासाठी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून पात्र विधीज्ञांकडून अर्ज **दि.२६/०३/२०२४** पर्यंत मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती :-**

१. विधीज्ञांची नेमणूक दि.१ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीसाठी राहील.

२. वरील कालावधीसाठी निवड झालेल्या विधीज्ञांना मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली/मा.उच्च न्यायालय, मुंबई, व खंडपीठ औरंगाबाद, नागपूर/ महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई /मा.जिल्हा न्यायालय व दिवाणी न्यायालय, सांगली, सर्व तालुका न्यायालय, सांगली/ मा.औद्योगिक न्यायालय, मा.कामगार न्यायालय, सांगली/ मा.ग्राहक तक्रार निवारण मंच, सांगली/ मे.मोटार अपघात दावे न्यायाधिकरण/ शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर यापैकी निवड झालेल्या न्यायालयांसाठी, सांगली जिल्हा परिषदेच्या वतीने न्यायालयीन प्रकरणे चालविणे आणि दैनंदिन कार्यालयीन समस्यांमध्ये सल्ला/अभिप्राय देणे बंधनकारक राहील.

३. प्रत्येक विधीज्ञास प्रकरणनिहाय नोंदवही ठेवावी लागेल व त्या प्रकरणाच्या प्रगती व निकालाची माहिती दर तीन महिन्यांनी सादर करावी लागेल. प्रत्येक त्रैमासिक कालावधी संपल्यानंतर १० दिवसामध्ये ज्या विधीज्ञांकडून त्यांच्याकडील प्रलंबीत व निकाली प्रकरणांचा अहवाल प्राप्त होणार नाही अशा विधीज्ञांना पुढे प्रकरण देणे बंद करणेत येईल.

४. सोपविण्यात आलेल्या प्रत्येक न्यायालयीन प्रकरणात प्रत्येक तारखेस उपस्थित राहून प्रकरणे चालवावी लागतील. कोणत्याही प्रकरणात एकतर्फी निकाल लागणार नाही किंवा अपिलाची मुदत टळणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

५. मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली/मा.उच्च न्यायालय, मुंबई, व खंडपीठ औरंगाबाद, नागपूर येथे जिल्हा परिषदेच्या विरुध्द दाखल झालेल्या प्रत्येक कोर्ट केसेस साठी कमाल रु.१२,५००/- (रुपये बारा हजार पांचशे) एवढी वकील फी व रु.२,५००/- (रुपये दोन हजार पांचशे) कोर्ट खर्च असे एकूण रु.१५,०००/- (पंधरा हजार) देणेत येतील.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, मे.जिल्हा न्यायालय व मे.मोटार अपघात दावे न्यायाधिकरण येथे जिल्हा परिषदेच्या विरुध्द दाखल झालेल्या प्रत्येक कोर्ट केसेस साठी कमाल रु.५,०००/- (रुपये पाच हजार) एवढी वकील फी व रु.२,०००/- (रुपये दोन हजार) कोर्ट खर्च असे एकूण रु.७,०००/- (सात हजार) देणेत येतील.

मे.दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, वरिष्ठ स्तर (जिल्हा स्तर व तालुका स्तर), मे.औद्योगिक न्यायालय व कामगार न्यायालय, सांगली, तसेच मा.ग्राहक तक्रार निवारण मंच, सांगली/शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर येथील जिल्हा परिषदेच्या विरुध्द दाखल झालेल्या प्रत्येक कोर्ट केसेस साठी कमाल रु.३,५००/- (रुपये तीन हजार पांचशे) एवढी वकील फी व रु.१,५००/- (रुपये एक हजार पांचशे) कोर्ट खर्च असे एकूण रु.५,०००/- (रुपये पांच हजार) देणेत येईल. सदर नमूद वकील फी व कोर्ट खर्च हा प्रत्येक केस साठी अंतीम निर्णय लागपर्यंतचा असेल. त्यामध्ये, केस दाखल झाल्याबरोबर अथवा समन्स प्राप्त झाल्यानंतर अर्धी (१/२) वकील फी आणि अर्धा (१/२) कोर्ट खर्च अदा करणेत येईल आणि उर्वरित फी प्रकरणाचा अंतीम निकाल लागल्यानंतर आणि निकालाच्या अंतीम प्रमाणीत प्रती बिलासोबत सादर केल्यानंतरच अदा करणेत येईल. तसेच जिल्हा परिषदेच्या वतीने केस दाखल करावयाची असलेस होणारा प्रत्यक्ष खर्च देण्यात येईल. अतिरिक्त वकील फी बाबत प्रकरणपरत्वे निर्णय घेण्यात येईल. तथापि, मासीक मानधन किंवा कोणताही भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

६. प्रत्येक न्यायालयीन प्रकरणामध्ये अंतरीम/अंतीम निर्णय झाल्यानंतर त्याची प्रमाणीत प्रत जिल्हा परिषदेला पाठवून त्यावर जिल्हा परिषदेने कोणती कार्यवाही करणे अपेक्षित आहे त्याबाबत लेखी पत्राने कळविणे आवश्यक राहील.

७. जिल्हा स्तरीय न्यायालयामध्ये किमान ०५ वर्षे (पांच वर्षे) वकीली व्यवसायातील अनुभव (दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठी) आवश्यक राहील. सदरचा अनुभव नसल्याचे निदर्शनास आल्यास कोणत्याही क्षणी नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरणास राहतील.

८. विधीज्ञांना बार कॉन्सील ऑफ महाराष्ट्र अँड गोवा, मुंबई यांचेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तसेच विधीज्ञाचा वकीली व्यवसायाचा अनुभव विचारात घेण्यासाठी संबंधीत विधीज्ञ ज्या न्यायालयाच्या न्यायीक अधिकारी कक्षेत प्रत्यक्ष वकीली व्यवसाय करीत असतील त्या न्यायालयाच्या सक्षम प्राधिकरणाने निर्गमीत केलेले अनुभव प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (नोंदणी प्रमाणपत्राच्या व अनुभव प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडाव्यात.)

९. पॅनेलवर निवड झाल्यानंतर या जिल्हा परिषदेच्या किंवा जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अधीनस्त कार्यालयाच्या विरुध्द प्रकरण न घेणे व न चालविणे किंवा कायदेशीर सल्ला न देणे बंधनकारक राहील.

१०. एकाच मुद्यावर किंवा विषयावर अनेक प्रकरणे एकाच न्यायालयात दाखल झालेली असल्यास सदर प्रकरणे एकाच विधीज्ञाकडे सोपविण्यात येतील.

११. एकाच प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी किंवा इतर अधिकारी प्रतिवादी असल्यास ते एकच प्रकरण समजण्यात येईल व अशा प्रकरणात एका प्रकरणासाठी अनुज्ञेय असलेली फी अदा करण्यात येईल.

१२. दर चार महिन्यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद, सांगली यांचे अध्यक्षतेखाली प्रकरणांचा आढावा घेण्यात येईल. या बैठकीस उपस्थित राहून प्रलंबीत प्रकरणांचा तथा निकाली प्रकरणांचा अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

१३. प्रत्येक कायदेशीर नोटीशीस उत्तर देणे अथवा नोटीस देणेसाठी प्रती प्रकरण र.रु.१०००/- (रु.एक हजार मात्र) देणेत येतील.

१४. मा.उच्च न्यायालय/मा.सर्वोच्च न्यायालयातील दाखल केसेसमध्ये आवश्यकतेनुसार पॅरावाईज रिप्लाय तयार करुन द्यावा लागेल. प्रत्येक पॅरावाईज रिप्लाय तयार करुन देणेसाठी र.रु.५००/- अदा करणेत येतील. तसेच प्रत्येक कायदेशीर अभिमतासाठी र.रु.५००/- अदा करणेत येतील

१५. नियुक्ती रद्द करण्याचे अथवा विवक्षित प्रकरणी विशेष वकील नियुक्त करणेचे अधिकार नियुक्ती प्राधिकरणास राहतील.

१६. अर्ज **करण्याची पध्दत :** अर्ज मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचे नांवे करावा. तसेच अर्जामध्ये कोणत्या न्यायालयात काम करण्यासाठी इच्छुक आहात याची स्पष्ट नोंद असावी, अर्जा सोबत सर्व शैक्षणिक कागदपत्रे, कायद्याची पदवी, बार कौन्सिल कडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र, सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले अनुभव प्रमाणपत्र, स्वयं साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती जोडाव्यात.

(तृप्ती धोडमिसे) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सांगली